रविवार, दि. ०२ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३३२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# अण्णाभाऊ साठे स्मारकाचे स्वखर्चाने सुशोभीकरण करणार - आ. अर्जुनराव खोतकर

## सर्व पक्षीय उत्सव समिती तर्फे लोकोपयोगी उपक्रमांनी जयंती साजरी







**जालना प्रतिनिधी**

साहित्यरत्न, लोकशाहीर, अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती शुक्रवारी ( ता. ०१) जालना शहरासह जिल्हाभरात उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. जालना जिल्हा सर्व पक्षीय जयंती उत्सव समितीच्या वतीने जुना जालना भागातील उड्डाणपुलाखाली असलेल्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर अभिवादन सोहळा, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, रक्तदान शिबीर आणि वृक्षारोपण असे लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. गायक प्रतिक सोळसे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य आणि कार्यावर आधारित बहारदार गीतांचे सादरीकरण करून जयंती उत्सवात रंगत भरली. अभिवादन सोहळ्यास स्वागताध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर , महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, भास्करराव पाटील दानवे, सत्कारमूर्ती उद्योजक घनश्यामदास गोयल, विष्णू गवळी, राजेंद्र घुले, कवी कैलास भाले, गणेश चौधरी, सभापती संध्याताई देठे ,अशोक आण्णा पांगारकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी,समितीचे अध्यक्ष किरण शिरसाठ,कार्याध्यक्ष ज्ञानदेव नागरे, सचिव संतोष रासवे, कोषाध्यक्ष संतोष राम निकाळजे ,उपाध्यक्ष इब्राहिम शेख , किशोर कांबळे,ज्येष्ठ नेते पंडितराव भुतेकर, अशोक साबळे, सुधाकर निकाळजे, संजय इंचे,सुनील साळवे, रविकांत जगधने,विष्णू पाचफुले,शेख महेमूद, सिद्धिविनायक मुळे, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड .परमेश्वर गडगिळे ,सचिव ॲड . विनोद कुलकर्णी,सगीर पहेलवान,करूणा नामवाड, सचिन क्षीरसागर, अंकुश राजगिरे, शिवप्रकाश चितळकर,प्रा. राजेंद्र भोसले,गणेश सुपारकर, विनोद आठवे,राजेंद्र जाधव,सरपंच राहुल गवारे,रवींद्र ढगे,कृष्णा पांडव, पिटर खंदारे,सुहास मुंढे, सुनील पवार, मिर्झा अन्वर बेग,सचिन ( नन्नु) कांबळे, विक्की हिवाळे आदींची उपस्थिती होती. आ. अर्जुनराव खोतकर याप्रसंगी म्हणाले, शिक्षणाची बंदी असलेल्या साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी दीड दिवसाची शाळा शिकून साहित्याचे विद्यापीठ उभे केले. जगाला भुरळ घालणारे २७ भाषांत त्यांचे साहित्य होते. संयुक्त महाराष्ट्र लढ्यात महाराष्ट्राप्रति असलेल्या त्यांचा प्रेमभाव गायनातून दिसून आला. कठीण परिस्थितीत स्वाभिमान गहाण ठेवायचा नाही, ही शिकवण अण्णाभाऊंनी दिली असून त्यांच्या स्मारकाचे सुशोभीकरणास महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा सर्व खर्च आपण स्वतः देणार असल्याची घोषणा आ.खोतकर यांनी करताच टाळ्यांचा कडकडाट झाला.

उपमहापौर राजेश राऊत यांनी महानगरपालिकेच्या वतीने महापुरुषांचे पुतळे सुशोभीकरणासह अण्णाभाऊ साठे कॉम्प्लेक्स चे पुनर्निर्माण करणयाचे वचन दिले. भास्करराव पाटील दानवे यावेळी म्हणाले, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे स्मारकाजवळ चबुतरा तसेच शिडी उभारण्याचे काम दोन वर्षांपूर्वी आपण केले असून आगामी सर्वसाधारण सभेत सुशोभीकरणाचा प्रस्ताव आपण स्वतः मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात किरण शिरसाठ यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचे सुशोभीकरण करावे ,आगामी हिवाळी अधिवेशनात आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करण्याबाबत निर्णय घ्यावा,अण्णाभाऊ साठे शॉपिंग कॉम्प्लेक्सची दुरावस्था दूर करून पुनर्निमान **(पान २ वर)**

# हिंदू महासभेच्यावतीने धनसिंह सूर्यवंशी यांना पुण्यात हिंदुत्वनिष्ठ पुरस्कार प्रदान

## जालन्यात लवकरच नागरी सत्कार-ॲड. ईश्वर बिल्होरे

**जालना - प्रतिनिधी**

देव, देश आणि धर्मासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे हिंदू महासभेचे प्रदेश संघटनमंत्री धनसिंह सूर्यवंशी शनिवार दि. १ऑगस्ट रोजी पुणे येथील ऐतिहासिक टिळक स्मारक मंदिरात अखिल भारत हिंदू महासभेतर्फे राष्ट्रीय अध्यक्ष मुन्नाभाई शर्मा यांच्या हस्ते अत्यंत प्रतिष्ठेचा कै. गणपतराव नलावडे हिंदुत्वनिष्ठ पुरस्कार देऊन जाहीर गौरव करण्यात आला. यापूर्वी त्यांना हिंदुशौर्य पुरस्काराने देखील सन्मानित करण्यात आले आहे.





सूर्यवंशी यांना मिळालेल्या या सर्वोच्च बहुमानामुळे संपूर्ण देवगिरी प्रांतात अभिमानाची लाट पसरली असून, लवकरच जालना नगरीत त्यांचा अभूतपूर्व नागरी सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती हिंदू महासभेचे देवगिरी प्रांत प्रमुख ॲड. ईश्वर बिल्होरे यांनी दिली.

धनसिंह सूर्यवंशी हे हिंदुत्वाचे खंबीर पाठीराखे ज्येष्ठ पत्रकारदेखील आहेत. आहेत. कोणत्याही संकटाची तमा न बाळगता, आपल्या परखड लेखणीने आणि विचारांनी त्यांनी समाजाला नेहमीच जागी ठेवले. आधी हिंदुशौर्य आणि आता हिंदुत्वनिष्ठ पुरस्कार हा त्यांच्या वर्षानुवर्षांच्या प्रामाणिक संघर्षाचा, त्यागाचा आणि अखंड तपस्येचा सर्वोच्च बहुमान आहे. पुण्याच्या व्यासपीठावर जेव्हा हा सन्मान प्रदान करण्यात आला, तेव्हा संपूर्ण सभागृह जयघोषाने दुमदुमून गेले होते.

सुर्यवंशी यांच्या यशाने जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. हाच सुवर्णक्षण साजरा करण्यासाठी हिंदू महासभा देवगिरी प्रांताच्यावतीने जालना येथे लवकरच एका भव्य आणि ऐतिहासिक नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. या सोहळ्याला अनेक केंद्रीय व राज्यस्तरीय हिंदुत्वनिष्ठ नेते, संत-महंत आणि हजारो राष्ट्रप्रेमी नागरिक उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती ॲड. बिल्होरे यांनी दिली. धनसिंह **(पान २ वर)**

# ज्येष्ठ माजी नगरसेवक चंपालाल भगत यांचे निधन

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील ज्येष्ठ माजी नगरसेवक तथा शिवसेनेच्या माजी नगराध्यक्ष भारती भगत यांचे पती चंपालाल भगत यांचे शुक्रवार, दि. १ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे ९ वाजता छत्रपती संभाजीनगर येथे उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच जालना शहरावर शोककळा पसरली. चंपालाल भगत हे अनेक दिवसांपासून आजारी असून छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. चंपालाल भगत यांनी जालना नगरपालिकेवर सलग तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून येत जनतेची सेवा केली होती. आपल्या शांत, मनमिळावू स्वभावामुळे आणि सामाजिक बांधिलकीमुळे त्यांनी नागरिकांमध्ये वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले आणि मोठा परिवार असा आप्तपरिवार आहे.

त्यांच्यावर जालना शहरातील मोठ्या पुलाजवळील स्मशानभूमीत सायंकाळी ६ वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध राजकीय पक्षांचे नेते, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अंत्यविधीस माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, शिवसेना आमदार अर्जुनराव खोतकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, माजी नगराध्यक्ष भास्कर आंबेकर, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समितीचे सभापती अशोक अण्णा पांगारकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णूभाऊ पाचपुले, माजी नगराध्यक्ष बबलू चौधरी, नगरसेवक भास्कर दानवे, सामाजिक कार्यकर्ते दिनेश भगत, वसंतराव जगताप, नगरसेवक दुर्गेश काठीपवटाले, माजी नगरसेवक संदीप नाईकवाडे, नगरसेवक अर्जुन गाई, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, अपंग जनता दलाचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे इकबाल पाशा, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) शहराध्यक्ष नंदू जांगडे, शिवसेनेचे विरोधी पक्षनेते कमलेश खरे, मेघराज भैय्या चौधरी, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे, सामाजिक कार्यकर्ते रणजीत मगरे, महानगरपालिकेचे स्वच्छता सभापती कपिल भुरेवाल, सामाजिक कार्यकर्ते दीपक **(पान २ वर)**



ब्रह्मास्त्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने आज लोकमान्य टिळक यांना विनम्र अभिवादन करण्यात आले त्यावेळी ब्रह्मास्त्रचे अध्यक्ष अमित कुलकर्णी, उपाध्यक्ष सुमित कुलकर्णी, गजेंद्र देशमुख, संजय कीर्तने, अमोल पाठक आदींची उपस्थिती होती.

# आरएसएसच्या नावाखाली फुले-शाहू-आंबेडकर विचारांमध्ये दरी निर्माण करण्याचा प्रयत्न

## डॉ. बाबासाहेबांविरोधात बोलणाऱ्यांना सोडणार नाही -सुधाकर निकाळजे

**जालना । प्रतिनिधी**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात जय भीम सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुधाकरभाई निकाळजे यांनी सामाजिक, राजकीय आणि दलित समाजाच्या विविध प्रश्नांवर भाष्य करत महायुती सरकार आणि आरएसएसवर गंभीर आरोप केले. त्यांनी समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप करत फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांवर ठाम राहण्याचे आवाहन केले.

निकाळजे म्हणाले की, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महामंडळ आज बंद पडण्याच्या स्थितीत आले आहे. यासाठी सरकारने नेमके काय केले, याचे उत्तर जनतेला मिळाले पाहिजे. समाजाच्या विकासासाठी स्थापन झालेल्या महामंडळांची अवस्था बिकट होत असताना सरकार मात्र मौन बाळगत असल्याची टीका त्यांनी केली. पुढे बोलताना त्यांनी आरोप केला की, आरएसएसच्या नावाखाली **(पान २ वर)**

# चातुर्मासनिमित्त जालन्यात आज भव्य मंगल कलश स्थापना सोहळा

## सकल जैन समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरात आयोजित भव्य वर्षायोग चातुर्मासनिमित्त काद्राबाद येथील श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ अग्रवाल दिगंबर जैन मंदिरच्यावतीने रविवार, दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातील गणेश भवन येथे मंगल कलश स्थापना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



प.पू. आचार्य श्री १०८ पवित्रसागरजी महाराज | प.पू. मुनिश्री प्रशांतसागरजी महाराज | प.पू. मुनिश्री प्रभावसागरजी महाराज

हा मंगल सोहळा प. पू. वात्सल्यमूर्ती आचार्य श्री १०५ पवित्रसागर महाराज यांच्या पावन सान्निध्यात आणि त्यांचे शिष्यवृंद मुनिश्री १०५ प्रशांतसागर महाराज, मुनिश्री १०८ **(पान २ वर)**

## संपादकीय पान

# कमी दराचा आग्रह योग्यच; पण निर्णय प्रक्रियेत विलंबही हिताचा नाही

जालना महानगरपालिकेच्या स्थायी समितीने पाणीपुरवठा योजनेच्या निविदेवरील अंतिम निर्णय स्थगित ठेवत संबंधित निविदाधारकांना दर कमी करण्यासाठी वाटाघाटीसाठी बोलावण्याचा घेतलेला निर्णय महत्त्वाचा मानावा लागेल. सार्वजनिक निधीतून होणाऱ्या प्रत्येक कामात आर्थिक शिस्त आणि पारदर्शकता आवश्यक आहे. त्यामुळे निविदेतील दर अवाजवी वाटत असल्यास त्याची सखोल छाननी करणे ही लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाची जबाबदारीच आहे. पाणीपुरवठा हा कोणत्याही शहरासाठी केवळ विकासाचा विषय नसून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित मूलभूत हक्क आहे. त्यामुळे या योजनेतील प्रत्येक रुपयाचा विनियोग योग्य पद्धतीने झाला पाहिजे. जर निविदेतील दर बाजारभावापेक्षा किंवा अंदाजपत्रकापेक्षा अधिक असल्याची शंका असेल, तर वाटाघाटी करून शासन आणि नागरिकांचा पैसा वाचविण्याचा प्रयत्न स्वागतार्ह आहे. मात्र, याचबरोबर एक दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. खर्च कमी करण्याच्या प्रयत्नात प्रकल्पाच्या अंमलबजावणीला अनावश्यक विलंब होऊ नये. जालना शहराने गेल्या काही वर्षांत पाणीटंचाई, अनियमित पाणीपुरवठा आणि वितरण व्यवस्थेतील त्रुटींचा वारंवार सामना केला आहे. अशा परिस्थितीत पाणीपुरवठा योजनेतील कोणताही विलंब हा थेट नागरिकांवर परिणाम करणारा ठरू शकतो.

निविदा प्रक्रिया ही केवळ सर्वात कमी दर स्वीकारण्यापुरती मर्यादित नसते. संबंधित कंत्राटदाराची आर्थिक क्षमता, तांत्रिक गुणवत्ता, काम पूर्ण करण्याची क्षमता आणि दर्जेदार कामाचा अनुभव यांचाही विचार करावा लागतो. कमी दराच्या नावाखाली निकृष्ट दर्जाचे काम होणार नाही, याची खात्री करणे तितकेच आवश्यक आहे. कारण सुरुवातीला वाचलेला पैसा नंतर दुरुस्ती आणि देखभालीवर अनेकपटीने खर्च करावा लागू शकतो.

स्थायी समितीने विभागप्रमुखांना तीन दिवसांत अनुपालन अहवाल सादर करण्याचे आदेश देत निष्काळजीपणावर दंडात्मक कारवाईचा इशारा दिला आहे. प्रशासनात उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी हा निर्णय सकारात्मक आहे. मात्र हा कडकपणा केवळ बैठकीपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष कामकाजातही दिसून यायला हवा. आदेश दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी झाली का, दोषींवर कारवाई झाली का आणि नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष फायदा झाला का, हे अधिक महत्त्वाचे आहे.

शहर विकासाच्या अनेक योजना कागदावर मंजूर होतात; पण प्रत्यक्ष अंमलबजावणीत विलंब, वाढीव खर्च आणि गुणवत्तेबाबतचे प्रश्न कायम राहतात. त्यामुळे पाणीपुरवठा योजनेच्या निविदेबाबतही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक असणे गरजेचे आहे. वाटाघाटीनंतर दर किती कमी झाले, अंतिम निर्णय कोणत्या निकषांवर झाला आणि त्यातून महानगरपालिकेची किती बचत झाली, ही माहितीही नागरिकांसमोर येणे आवश्यक आहे.

स्थायी समिती ही महानगरपालिकेची आर्थिक निर्णय घेणारी महत्त्वाची यंत्रणा आहे. त्यामुळे तिच्याकडून घेतले जाणारे निर्णय हे राजकीय नव्हे तर लोकहिताच्या निकषांवर आधारित असले पाहिजेत. पाणीपुरवठा योजनेच्या बाबतीतही हाच दृष्टिकोन कायम ठेवणे आवश्यक आहे. जालनाकरांना स्वच्छ, नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा हवा आहे.

# शीर्षस्थानी सत्यमेव जयते...!! पक्षांपेक्षा इतिहास अधिक दयाळू..!!

...भारतीय राजकारणात अनेकदा आरोपांची अशी वादळे उठलेली आहेत, ज्यामध्ये सत्य, संयम व प्रामाणिकपणाची कसोटी लागलेली आहे. हे वादळ शमल्यानंतर उशिराने का होईना, परंतु सत्य ठामपणे आपल्या जागी उभे असल्याचे दिसून आले आहे. याचा प्रत्यय तालाबीरा कोळसा खाण वाटप प्रकरणात (कोलगेट) सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाने पुन्हा एकदा आणून दिला आहे. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्यावरील सर्व आरोप रद्द करत सर्वोच्च न्यायालयाने त्यांना या प्रकरणी पूर्णपणे निष्कलंक अर्थात निर्दोष ठरवले आहे. कोळसा घोटाळा हा देशातील सर्वात मोठ्या घोटाळ्यांपैकी एक मानला जातो. मुळात हे संपूर्ण प्रकरण २००५ मधील ओडिशातील तालाबीरा कोळसा खाण वाटपाशी संबंधित आहे. ही खाण सुरुवातीला एनएलसी या सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीला मिळणार होती. परंतु, उद्योगपती कुमार मंगलम बिर्ला यांच्या हिंदाल्को कंपनीच्या अर्जानंतर सर्व नियम बाजूला ठेवून ही खाण त्यांना देण्यात आली. त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्याकडेच कोळसा मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार होता. त्यामुळे छाननी समितीच्या शिफारशी बदलून या निर्णयाला मंजुरी देण्यामध्ये त्यांच्या भूमिकेवर विरोधकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. विशेष म्हणजे डॉ. मनमोहन सिंग हे पंतप्रधान असूनही विशेष सीबीआय न्यायालयाने या प्रकरणात त्यांच्यासह उद्योगपती कुमार मंगलम बिर्ला, माजी कोळसा सचिव पी. सी.पारेख आणि अन्य तीन जणांना आरोपी म्हणून समन्स बजावले होते. किमान इतके स्वातंत्र्य त्यांच्या कार्यकाळात देशातील स्वायत्त संस्थांत टिकून होते. समन्स मिळाल्यानंतर डॉ. मनमोहन सिंग यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. तत्कालीन सरन्यायाधीशांनी प्राथमिक सुनावणीदरम्यान समन्सला स्थगिती दिली, त्यानंतर हे प्रकरण बराच काळ न्यायालयात प्रलंबित राहिले. या काळात, सीबीआयने या प्रकरणाचा सखोल तपास करत न्यायालयात एक क्लोजर रिपोर्ट दाखल केला, ज्यात म्हटले होते की, माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यावर खटला चालवण्यासाठी उपलब्ध पुराव्यांमध्ये पुरेशी कारणे नाहीत. मात्र, त्यावेळी सीबीआय न्यायालयाने हा क्लोजर रिपोर्ट फेटाळून लावला होता. त्यानंतर मनमोहन सिंग यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची, न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने मात्र सीबीआयने दाखल केलेला हा क्लोजर रिपोर्ट स्वीकारला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार खरे तर क्लोजर रिपोर्ट फेटाळण्याचे कोणतेही विशेष कारण सीबीआय न्यायालयाच्या न्यायाधीशांकडे नव्हते. अपीलकर्त्याच्या दुर्दैवी निधनामुळे हे अपील निष्फळ ठरवता आले असते. तरी, सीबीआयने दाखल केलेल्या दोन्ही क्लोजर रिपोर्टचा सर्वोच्च न्यायालयाने अभ्यास करत हा निकाल दिला आहे. युपीए-२ सरकारच्या काळात भाजप आणि विरोधी पक्षांनी कोळसा खाण वाटप व २जी स्पेक्ट्रमच्या मुद्द्यावरून सरकारला पार घेरले होते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात दोन लाख कोटी रुपयांचा कोळसा घोटाळा असा उल्लेख करत नरेंद्र मोदींनी डॉ. मनमोहन सिंग यांच्या वैयक्तिक प्रतिमेवर आणि प्रामाणिकपणावर चिखलफेक केली. इतकेच नव्हे, तर २०१७ मध्ये संसदेत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, सर्व घोटाळे होऊनही त्यांच्यावर एकही काळी खूण नाही, बाथरूममध्ये रेनकोट घालून आंघोळ कशी करायची हे फक्त डॉ.साहेबांनाच माहीत आहे, अशी उपरोधिक व अत्यंत वैयक्तिक स्वरुपाची टीका त्यांच्यावर केली होती. देशाच्या आर्थिक औद्योगिकीकरणाचे शिल्पकार आणि अत्यंत शांत, अभ्यासू व्यक्तिमत्त्व असलेल्या पंतप्रधानांना कमकुवत पंतप्रधान म्हणून हिणवण्यात आले.

२०१४ मध्ये पंतप्रधानपदावरून पायउतार होण्यापूर्वी घेतलेल्या आपल्या शेवटच्या पत्रकार परिषदेत डॉ. मनमोहन सिंग यांनी शांत पण ठाम शब्दांत एक वाक्य उच्चारले होते. माझ्या समकालीन माध्यमांपेक्षा आणि विरोधी पक्षांपेक्षा इतिहास माझ्याशी अधिक दयाळू असेल. इतिहासच माझ्या कामगिरीचे आणि सचोटीचे योग्य मूल्यमापन करेल. आज न्यायालयाच्या या निकालाने त्यांचे ते शब्द तंतोतंत खरे ठरले आहेत. ज्या आर्थिक व औद्योगिक धोरणांमुळे देशाचा पाया मजबूत झाला, त्यावर राजकीय स्वार्थासाठी भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते. परंतु, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने सर्व राजकीय टीकाकारांचे दावे आणि आरोप फोल ठरवले आहेत. राजकारणात तत्कालीन फायद्यासाठी कुणाच्याही चारित्र्यावर व प्रामाणिकपणावर शिंतोडे उडवणे सोपे असते; परंतु काळाच्या कसोटीवर केवळ सत्य टिकून राहते. डॉ. मनमोहन सिंग यांचे सामर्थ्य दीड-दीड तास वायफळ भाषण करण्यापेक्षा धोरणात्मक निर्णयक्षमता आणि संयम हे होते. डॉ. मनमोहन सिंग यांची कणखरता ही त्यांच्या बौद्धिक क्षमतेत, आर्थिक दूरदृष्टीत आणि प्रतिकूल परिस्थितीतही राजकीय दबाव न मानता योग्य निर्णय घेण्याच्या धैर्यात होती. त्यामुळे ताकद केवळ वक्तृत्वात नसते, तर राष्ट्रहिताच्या निर्णयात असते, हे त्यांनी त्यांच्या कार्यकाळात सिद्ध केले. डॉ. मनमोहन सिंग यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञ व निष्कलंक नेत्यावर भाजपच्या ज्या ज्या नेत्यांनी बिनबुडाचे आरोप केले, त्या सर्वांनी नाक घासून दिवंगत माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांची माफी मागायला हवी. शेवटी नियती आणि न्यायदेवता उशिरा का होईना, पण सत्य समोर आणतेच, हेच या प्रकरणाने सिद्ध केले आहे. शेवटी सत्याचाच विजय होतो. म्हणूनच भारताच्या महत्वाच्या आस्थापनांच्या शीर्षस्थानी सत्यमेव जयते, हे वाक्य लिहिलेले असते. मनमोहन सिंग आज हयात नाहीत, पण त्याची विश्वासार्हता पुन्हा एकदा उजळून निघाली आहे.



श्री. शिवाजी विठ्ठल चौगुले.
कागल-कोल्हापूर

# खासगांव येथे साहीत्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांची (१०६)वी जयंती उत्साहात साजरी

**खासगांव- प्रतिनिधी**

:जाफ्राबाद तालुक्यातील खासगांव येथे दि.१ ऑगस्ट शनिवार रोजी रामनगर चौक येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या( १०६)वी जयंतीनिमित्त खासगाव येथे या महान महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना विनंम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित संतोष पा.लोखंडे (भाजपा नेते,तथा मा.सरपंच आदर्श खासगांव) प्रल्हाद पा. लोखंडे गजानन पा.लोखंडे,तुळशीराम जाधव, संदीप जाधव,संदीप लोखंडे,दत्तू रोडगे, विनोद जाधव, योगेश लोखंडे,गणेश जाधव, कैलास यदमाळ, सुभाष जाधव, बालाजी



लोखंडे, संतोष लोखंडे, प्रविण लोखंडे,विशाल जाधव, युवराज जाधव, बबन जाधव,चंद्रकांत लोखंडे,सतिष लोखंडे ,विनोद जाधव, संतोष रोडगे, डॉ. आत्माराम लोखंडे, सुनिल जाधव,बळीराम ऊभरहंडे, गणेश म्हस्के, दिलीप रोडगे, ॲड.भुषण जोशी, प्रकाश लोखंडे, पुर्वी राज जाधव,गजानन लोखंडे, नंदकिशोर जाधव,संजय लोखंडे (पोलीस पाटील) आदि सर्व वीर लहुजी मित्र मंडळ आदर्श खासगांव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# दीपभारती विद्यालय माहोरा येथे अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी उत्साहात साजरी

**माहोरा- प्रतिनिधी**

दीपभारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, माहोरा येथे आज १ ऑगस्ट रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक एस. के. पांडे होते. त्यांच्या हस्ते दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

याप्रसंगी बोलताना श्री. पांडे म्हणाले की, ''लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे थोर साहित्यिक होते. त्यांच्या फकीरा सारख्या कादंबऱ्या आजच्या पिढीला प्रेरणादायी आहेत. महाराष्ट्र एकीकरणाच्या चळवळीत त्यांचे मोलाचे योगदान आहे. साहित्याच्या माध्यमातून त्यांनी जनजागृती केली. रशियामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पोवाड्याचे सादरीकरण करून त्यांनी शिवाजी महाराजांचा इतिहास जगाला सांगितला.''

लोकमान्य टिळक यांच्याविषयी बोलताना ते म्हणाले, ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे असे ठणकावून सांगणाऱ्या टिळकांचा स्वातंत्र्याबद्दलचा करारी बाणा तरुणांनी आत्मसात करावा. देशाला चांगले नेतृत्व मिळावे यासाठी विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त वाचन करावे.''

राम लहाने यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना मोबाईलकडे कमी लक्ष देऊन अण्णाभाऊंचे साहित्य वाचण्याचे आवाहन केले. ''महापुरुषांचे विचार समाजाला प्रेरणा देतात. भावी पिढीतूनच चांगले नेतृत्व घडेल'' असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिक्षक बाळाभाऊ कासोद यांनी केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पान १ व ४ वरुन...

### अण्णाभाऊ साठे...

करावे, अशा मागण्या केल्या.

जेष्ठ नेते अशोक साबळे,संजय इंचे, सुधाकर निकाळजे, रविकांत जगधने यांची यावेळी समायोचित भाषणे झाली. सुत्रसंचालन आशीष रसाळ यांनी केले तर समितीचे कार्याध्यक्ष ज्ञानदेव नागरे यांनी आभार मानले. शिवसेना नेते भास्करराव अंबेकर , काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड संजय काळबांडे , इकबाल पाशा,बबलू चौधरी, नंदकिशोर जांगडे, संजय देठे, अजित मानधनी, देविदास देशमुख,बाला परदेशी, दुर्गेश कठोठीवाले, सुनील साळवे, संतोष तूपसौंदर,सी.के.डोईफोडे, शांतीलाल लोंढे, यांच्यासह महिला, तरुण, नागरिकांनी मोठ्या संख्येने सोहळ्यास भेटी देऊन शुभेच्छा दिल्या.

प्रबोधनात्मक कार्यक्रम, सत्कारमूर्तींचा गौरव..!

सामाजिक, साहित्यिक, पत्रकारिता, उद्योग व्यवसाय, रक्तसंकलन अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सत्कारमूर्ती उद्योजक घनश्यामदास गोयल, विष्णू गवळी, राजेंद्र घुले, कवी कैलास भाले, गणेश चौधरी, यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून गौरविण्यात आले.

''इंडियन आयडॉल'' फेम गायक प्रतीक सोळसे यांनी वंदन अण्णाभाऊंना...अशा एकापेक्षा एक बहारदार गीतांचे सादरीकरण करून जमलेल्या हजारो बांधवांना मंत्रमुग्ध केले. यावेळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा विजय असो..,क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचा विजय असो.., अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

### हिंदू महासभेच्यावतीने...

सुर्यवंशी हे केवळ माझे गुरु नाहीत, तर मला बोटाला धरून चालवणारे माझे मोठे बंधू आणि माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे आमचे पाठीराखे आहेत. संकटात कसे लढायचे आणि आपल्या विचारांशी कसे एकनिष्ठ राहायचे, हे आम्ही त्यांच्याकडूनच शिकलो, असे ते म्हणाले.

### ज्येष्ठ माजी...

भुरेवाल, प्रकाश घोडे पाटील, दीपक यादव, किशोर पांगारकर, सुरेश राऊत यांच्यासह विविध सामाजिक, राजकीय, धार्मिक संघटनांचे पदाधिकारी व शेकडो नागरिक उपस्थित होते.

चंपालाल भगत यांच्या निधनाने जालना शहराने एक अनुभवी, अभ्यासू आणि जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारा लोकप्रतिनिधी गमावल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. त्यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

### आरएसएसच्या नावाखाली...

फुले, शाहू, आंबेडकर, मातंग आणि बौद्ध समाजामध्ये दरी निर्माण करण्याचे काम सुरू आहे. समाजात एकोपा निर्माण करण्याऐवजी विभाजनाचे राजकारण होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

महायुती सरकारवर निशाणा साधताना निकाळजे म्हणाले की, १४ हजार महादलित वस्तींचा निधी पळविण्यात आला असून, या प्रश्नावर लोकप्रतिनिधींनी आवाज उठवला पाहिजे. दलित समाजाच्या विकासासाठी असलेला निधी योग्य ठिकाणी खर्च व्हावा, अशी मागणी त्यांनी केली.

ते पुढे म्हणाले की, संगीता गोरंट्याल नगराध्यक्ष असताना प्रीतीसुधा नगर, भाग्यनगर आणि संभाजीनगर परिसरातील दलित वस्त्यांसाठी साडेचार कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला होता. मात्र आजही अनेक प्रश्न कायम आहेत. याबाबत मातंग समाज आणि बौद्ध समाजातील लोकांनीही एकत्र येऊन आपली भूमिका मांडावी, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी कोणतीही अवमानकारक भाषा सहन केली जाणार नाही, जे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विरोधात बोलेल त्याचा तंगड तोडल्याशिवाय राहणार नाही असा इशाराही निकाळजे यांनी दिला. ''जे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात बोलतील, त्यांना आम्ही सोडणार नाही,'' असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमास शिवसेना आमदार अर्जुनराव खोतकर, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, जय भीम सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुधाकरभाई निकाळजे, शिवसेना शहरप्रमुख विष्णूभाऊ पाचपुले यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि परिवर्तनवादी कार्याला अभिवादन करण्यात आले. तसेच सामाजिक ऐक्य, समता आणि संविधानाच्या मूल्यांचे रक्षण करण्याचे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले.

### चातुर्मासनिमित्त...

प्रभावसागर महाराज यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. सायंकाळी ४ ते ६.३० या वेळेत वात्सल्य भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक आणि पुण्यप्रद सोहळ्यास समाज बांधव आणि भगिनींनी कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन सकल जैन समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

### रस्त्यांवरील मोकाट...

ॲड. महेश धन्नावत यांनी पुढे नमूद केले की, जालना शहराचे आता महानगरपालिकेत रूपांतर झाले असल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशानंतर पालिका प्रशासनाला कोणतीही पळवाट उरलेली नाही. जालना महानगरपालिकेने तात्काळ शहरातील सर्व जनावरांचे टॅगिंग करून त्यांच्या मालकांवर कायदेशीर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. महापालिका प्रशासनाने मोकाट जनावरांसाठी आवश्यक त्या सोयी-सुविधांनी युक्त कोंडवाडे व गोशाळांची निर्मिती करून जबाबदार नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. जर महापालिका प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे किंवा मोकाट जनावरांमुळे भविष्यात अपघात घडून जीवितहानी झाली, तर बाधितांना महापालिकेकडूनच योग्य भरपाई मिळवून देण्यासाठी आणि अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय जालन्यातील नागरिकांसाठी अत्यंत मोलाचा कायदेशीर आधार ठरेल.

### सीजीएचएस लाभार्थी...

लाभार्थ्यांना तज्ज्ञ डॉक्टरांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन करून आवश्यक वैद्यकीय सल्लाही दिला. या शिबिराचा मोठ्या संख्येने उपस्थित लाभार्थ्यांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संघटनेचे पदाधिकारी रंगनाथन कुमार, सुभाष धुळेकर, ज्ञानेश तांबेकर, रामचंद्र ठाकूर, सोमनाथन, ज्योत्स्ना महाडिक यांनी विशेष परिश्रम घेतले. सुभाष धुळेकर यांनी सूत्रसंचालन केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल सर्व उपस्थित मान्यवर, डॉक्टर, स्वयंसेवक आणि लाभार्थ्यांचे रामकृष्ण ठाकूर यांनी आभार मानले.

### कर्मांचा न्याय अटळ...

त्याग, धर्मनिष्ठा, दूरदृष्टी आणि राष्ट्रहितासाठी घेतलेल्या निर्णयाचा प्रेरणादायी प्रसंग कथन केला. वैयक्तिक स्वार्थापेक्षा समाज, संस्कृती आणि धर्मरक्षणाला प्राधान्य देणारे जीवनच खऱ्या अर्थाने आदर्श ठरते. संकटाच्या प्रसंगी संयम, विवेक आणि कर्तव्यभावना जपणारी व्यक्तीच इतिहास घडवते, असे त्यांनी नमूद केले.

प्रवचनाच्या शेवटी महासती श्री निर्मलाजी म.सा. यांनी उपस्थितांना धर्मश्रवणाबरोबरच धर्माचे आचरण जीवनात उतरविण्याचे आवाहन केले. मन, वचन आणि कर्म यांची शुद्धी साधत आत्मजागृतीचा मार्ग स्वीकारल्यासच जीवन सार्थक होऊन मोक्षमार्गाची वाट सुकर होते, असा संदेश त्यांनी दिला.

या धर्मसभेला ध्यानयोगी आचार्य पूज्य श्री शिवमुनिजी म.सा. यांच्या आज्ञानुवर्ती, आगम गगनचंद्रिका, संयम सुमेरू, गुरुणीमैया महासाध्वी पूज्य श्री कौशल्याजी म.सा. श्रमणी यांच्या प्रशिष्य तथा स्वर्ण संयमज्योती उपप्रवर्तिनी महासती श्री प्रमिलाजी म.सा. यांच्या सुशिष्य तपकौमुदी उपप्रवर्तिनी महासती श्री निर्मलाजी म.सा., तपचंद्रिका महासती श्री नंदिनीजी म.सा., महासती श्री उपमाजी म.सा., महासती श्री उपासनाजी म.सा. तसेच महासती श्री ऋषिताजी म.सा. (आदि ठाणा ५) यांची पावन उपस्थिती लाभली. प्रवचनाचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने श्रावक-श्राविका उपस्थित होते.

### नांदखेडा, किन्ही...

सतीश सवडे, दीपक माळी, संतोष खरात, दीपक माळी, संतोष जंजाळ, ज्ञानेश्वर पवार, रतन पवार, अशोक सवडे, गजानन पवार ज्ञानेश्वर सवडे, कल्याण सवडे,यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रती आमदार संतोष पाटील दानवे, तहसीलदार, जाफ्राबाद तसेच उपकार्यकारी अभियंता, टेंभुर्णी यांनाही देण्यात आल्या आहेत.

# सुंदर नाते मैत्रीचे

मैत्री पाहायला गेलं तर अगदी दोन अक्षरी शब्द पण या दोन अक्षरी शब्दात जगातील सर्वात पवित्र अशी भावना लपली आहे. जगातील सर्वात सुंदर नातं कोणतं असेल तर ते मैत्रीचं नातं, कारण या नात्यात कोणताही स्वार्थ नसतो. मैत्री कधीही ठरवून होत नाही. मैत्री कशी, कधी, कोणाशी होईल हे कोणीच सांगू शकत नाही. मैत्रीला काळाची, वेळेची, वयाची बंधने नसतात. मैत्रीत जात, धर्म, वर्ण, लिंग असा कोणताही भेदभाव नसतो. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत कोणाशीही मैत्री होऊ शकते. समान छंद, समान आवडी, समान विचारधारा आणि परस्परांचे स्वभाव जुळले की मैत्री जमते. रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचे नाते महत्वाचे आहे. जगात मित्र नाही असा कोणताच व्यक्ती नाही. भारतात तर पौराणिक काळापासून मैत्रीला महत्व आहे. श्रीकृष्ण सुदामा यांची तर मैत्री अजरामर आहे. काळ बदलला तरी मैत्रितील पवित्र भावना आजही तीच आहे. मैत्री ही प्रामाणिक आणि तरळ भावना आहे. मित्रा समोरच आपण आपलं मन मोकळं करू शकतो. मानवी जीवनात क्षणाक्षणाला काहीना काही घडत असते. काही चांगले काही वाईट घडत असते. या ब्याा वाईट घटनांच्या अपरिहार्यतेचा विचार करता मैत्री आणि मित्र आवश्यक असतातच. मंदिरातील देवासमोर जसे आपण आपले मन मोकळे करतो तसेच आपण आपल्या खऱ्या मित्रा जवळही आपले मन मोकळे करतो. आजकाल मैत्रीतही हिशोबीपणा आला आहे. मैत्रीतही स्वार्थ आला आहे. त्यामुळे मैत्रिची पवित्र भावना काळवंडू लागली आहे. स्वार्थाच्या अंधारात मैत्री चाचपडू लागली आहे त्यामुळे मैत्रीतून मिळणारा आनंदही कमी होऊ लागला आहे. स्वार्थी मित्र आपण सहज ओळखू शकतो. स्वतःच्या स्वार्थासाठी जवळ येणारे मित्र आपल्याला संकटकाळात मदत करत नाहीत. जो आपल्याला संकटकाळात मदत करतो तोच खरा मित्र असतो. जीवनाच्या प्रवासात अनेक मित्र भेटतात, निघून जातात पण मनाने जुळलेले मित्र मात्र कायम राहतात. मित्रांमुळे आपल्याला व्यवहार कळतो. अडचणी सुटतात, संकटावर मात करण्याचे धाडस निर्माण होते. मैत्रीमुळे आपली निर्णय क्षमता वाढते. इतकेच काय तर मैत्रीमुळेच माणूसकी जिवंत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. केवळ सहवास म्हणजे मैत्री नव्हे, सहवास आणि मैत्री यात फरक आहे. सहवासाने मैत्री फुलत जाते हे जरी खरे असले तरी मैत्रीसाठी मित्र दररोज जवळ असावाच असे काही नाही.

अनेकदा जिवलग मित्र जवळ नसतात. कित्येक दिवस त्यांच्यात बातचीत होत नाही तरीही त्यांची मैत्री कायम असते अगदी श्रीकृष्ण सुदाम्या सारखी. पु .ल. देशपांडे यांनी मैत्री विषयी एक फार सुंदर कविता लिहिली आहे. ते लिहितात

रोज आठवण व्हावी असे काही नाही.
इतकंच काय रोज बोलणं व्हावं असंही काही नाही.
पण मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री आणि तुला याची जाणीव असणे ही झाली मैत्री.

अशी सरळ सोपी पण घट्ट मैत्री टिकवणं, निर्माण करणं फार कठीण नाही आणि फार सोपंही नाही. मनाचा एवढा हळवेपणा नवरा बायकोच्या नात्यामध्ये नाही हो येत, तिथे मित्रच असावा लागतो. कारण इतर कोणत्याही नात्याला आपण नाव दिले की, त्याबरोबर कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आणि शारीरिक बंधने येतात. या नात्याला मात्र कसले नाव नाही त्यामुळे कसली बंधनंही नाहीत किंबहुना ती तशी नसावीतही. मित्रांशी वाट्टेल त्या विषयावर आपण गप्पा मारू शकतो, मोकळे होऊ शकतो, तिथे स्त्री - पुरुष, जात - पात, वय काही आडवे येत नाही. मनसुबा बनून जातो आणि मन आनंदी होतं. शेवटी काय हो भेटी नाही झाल्या तरी गाठी बसणं महत्वाचं. ज्यांनी हे जाणलं त्यांनी माणसातलं माणूसपण जाणलं. पु ल नी मैत्री विषयी किती छान शब्दात लिहिलंय. मैत्री अशीच असते अगदी सुंदर. ज्याने मैत्रीचे सुंदर नाते जपले त्याचे जीवन आनंदाने फुलून गेले. मैत्रीसारखे सुंदर नाते या जगात दुसरे कोणतेही नाही, ज्याला मैत्री समजली त्याला जीवन समजले.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# अण्णाभाऊंच्या विचारांचा वारसा जपणे हेच त्यांना खरे अभिवादन - मनोज कोलते

*लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन*



**जालना । प्रतिनिधी**

लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र स्वराज्य सेना कामगार संघटनेच्या वतीने शनिवारी अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. संघटनेचे अध्यक्ष मनोज कोलते पाटील यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी अण्णाभाऊंच्या कार्याला आणि विचारांना उजाळा देत सामाजिक समतेचा संदेश दिला.

यावेळी बोलताना अध्यक्ष मनोज कोलते पाटील म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि लोककलेच्या माध्यमातून अन्याय, शोषण आणि विषमतेविरुद्ध बुलंद आवाज उठविला. समाजातील शेवटच्या घटकाला न्याय, स्वाभिमान आणि सन्मानाचे जीवन मिळावे, यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचे साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाज परिवर्तनाची प्रभावी चळवळ होती.


ते पुढे म्हणाले की, शिक्षणाची दारे बंद असतानाही अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या असामान्य प्रतिभेच्या जोरावर साहित्याचे एक मोठे विद्यापीठ उभे केले. त्यांनी कथा, कादंबऱ्या, पोवाडे, लावण्या आणि शाहिरीच्या माध्यमातून जनजागृती केली. त्यांच्या साहित्याची अनेक भाषांमध्ये भाषांतरे झाली असून त्यांच्या कार्याने देशासह जगालाही भुरळ घातली आहे. ते केवळ साहित्यिक नव्हते, तर सामाजिक परिवर्तनाचे महान शिल्पकार होते.

''सामाजिक समता, बंधुता आणि राष्ट्रनिर्मितीच्या मूल्यांना बळकटी देण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे आणि तो पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आजच्या युवकांनी त्यांच्या संघर्षमय जीवनातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करावे,'' असे आवाहनही मनोज कोलते पाटील यांनी यावेळी केले.

कार्यक्रमात उपस्थितांनी अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक योगदानाचा गौरव करत त्यांच्या कार्याला अभिवादन केले. समाजातील वंचित, कष्टकरी आणि कामगार वर्गाच्या हक्कांसाठी त्यांनी दिलेला लढा आजही प्रेरणादायी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

यावेळी अनिल कोलते , कांता मिटकरी, लता पाटोळे, संध्या झाल्टे, लांडगे ताई, इंदुबाई जाधव यांच्यासह महाराष्ट्र स्वराज्य सेना कामगार संघटनेचे पदाधिकारी, महिला मंडळाच्या कार्यकर्त्या तसेच संघटनेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे स्मरण करून सामाजिक एकात्मता आणि समतेची शपथ घेण्यात आला.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे



आज १ ऑगस्ट, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची आज १०६ वि जयंती. मराठी मातीत जन्मलेलं एक अनमोल रत्न म्हणजे अण्णाभाऊ साठे. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शिधोजी साठे तर आईचे नाव वालुबाई. त्यांचे मूळ नाव तुकाराम असे होते. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखीची त्यामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. अण्णाभाऊ केवळ दीड दिवस शाळेत गेले बाकीचे सर्व शिक्षण मुंबईच्या झोपडपट्टीत झाले. मुंबईत सुरवातीला त्यांनी मिळेल ती कामे केली नंतर त्यांना मुंबईतील गिरणीमध्ये झाडूवाल्याची नोकरी मिळाली. तिथेच त्यांना कामगारांच्या कष्टमय, दुःखमय जीवनाचे दर्शन झाले. कामगारांचे, संप, मोर्चे पाहून त्यांनी त्यांचा लढाऊपणाही अनुभवला. १९३६ साली कामगार नेते श्रीपाद अमृत डांगे यांच्या विचारांनी प्रभावित होऊन ते कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते बनले. मुंबईत त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे ऐकली. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी ते इतके प्रभावीत झाले की त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना आपले गुरू मानले. वडीलांच्या निधनानंतर घरची जबाबदारी त्यांच्यावर पडल्यानंतर ते पुन्हा१ गावी आले. तिथे बापू साठे या त्यांच्या चुलतभावाच्या तमाशा फडात ते काम करू लागले. १९४२ च्या आंदोलनात सहभागी झाल्याने त्यांच्यावर पोलिसांनी पकड वारंट काढले. पोलिसांना चुकवत ते पुन्हा मुंबईला आले. मुंबईत आल्यावर लोकशाहीर म्हणून ते नावारूपास आले.

१९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने लाल बावटा या कलापथकाची त्यांनी स्थापना केली. पुढे त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेतला. त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, लोकनाट्ये यांचा समावेश असे. महाराष्ट्राची परंपरा, मुंबई कोणाची? ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्ये खूप गाजली. अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, बेकायदेशीर, पुढारी मिळाला यासारखी त्यांनी लिहिलेली अनेक वगनाट्य लोकप्रिय झाली. अण्णाभाऊंच्या साहित्यात कथा कादंबरीची निर्मिती ठळकपणे नजरेत भरते. जिवंत काडतुसे, आबी, खुलंवाडी, बरबाद्या कंजारी, चिरागनगरची भुते, कृष्णाकाठच्या कथा हे त्यांनी लिहिलेले कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. अण्णाभाऊंनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा, फकिरा, वारणेचा वाघ, माकडीचा माळ, रानगंगा, चिखलातील कमळ, वैजयंता या त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या खूप गाजल्या. फकिरा या त्यांच्या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. फकिरा ही आजही सर्वाधिक विकली जाणारी कादंबरी आहे.

अनेक विद्यापीठात या कादंबरीचा अभ्यासक्रमात समावेश आहे. जो व्यक्ती अवघे दीड दिवस शाळेत गेला त्या व्यक्तीची साहित्य संपदा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आली हा आधुनिक युगातील एक चमत्कार आहे. म्हणूनच अण्णाभाऊ हे आधुनिक युगातील साहित्यरत्न आहे. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले. उपेक्षित गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहत होते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. जग बदल घालुनी घाव! सांगून गेले मज भीमराव! हे त्यांचे गीत खूप गाजले. माझी मैना गावाकडं राहिली... ही त्यांची लावणी तर अविस्मरणीय आहे. पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे असे ते नेहमी म्हणत. मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दुःख, दारिद्र्य त्यांच्या साहित्यातून प्रकट होते. जगातील सत्तावीस भाषांमध्ये अण्णाभाऊंच्या साहित्याचे भाषांतर झाले आहे. १९५७ साली झालेल्या दलित साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. महाराष्ट्रातील विद्यापीठांत अण्णाभाऊंवर अकरा प्रबंध प्रसिद्ध केले गेले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ अण्णाभाऊ साठे अध्यासन सुरू करण्यात आले आहे. असा हा पददलितांच्या जीवनावर वास्तव लिहिणारा साहित्यरत्न १८ जुलै १९६९ रोजी कालवश झाला. आज त्यांची १०६ वि जयंती त्यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे : माझी मैना... मागील महाराष्ट्राच्या अस्मितेचा इतिहास

१ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वातेगाव येथे तुकाराम भाऊराव साठे अर्थात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जन्म झाला. अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थिती, जातीय विषमता आणि उपासमारीच्या छायेत त्यांचे बालपण गेले. औपचारिक शिक्षणाची संधी न मिळाल्याने त्यांनी जीवनालाच आपले विद्यापीठ मानले. दुष्काळ आणि गरिबीमुळे कुटुंबासह त्यांनी मुंबई गाठली. गावातील कष्टमय आयुष्य आणि सामाजिक उपेक्षेने त्यांच्या मनात अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द निर्माण केली आणि हाच त्यांच्या जीवनप्रवासाचा पहिला निर्णायक टप्पा ठरला.

मुंबईत आल्यावर अण्णाभाऊ साठे यांनी हमाली, बांधकाम मजुरी, गिरणी परिसरातील श्रम, बूट पॉलिश, हातगाडी ओढणे अशी अनेक कष्टाची कामे केली. झोपडपट्ट्यांतील जीवन, गिरणीकामगारांचे हाल, कष्टकरी समाजाचे दुःख आणि वंचितांच्या वेदना त्यांनी स्वतः अनुभवल्या. याच अनुभवांनी त्यांच्या लेखणीला धार दिली आणि ते लोकशाहीर म्हणून घडले. त्यांनी पोवाडे, लावण्या, लोकनाट्ये, कथा आणि कादंबऱ्यांच्या माध्यमातून शोषित समाजाचा आवाज बुलंद केला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, कामगार चळवळ आणि सामाजिक समतेच्या लढ्यात त्यांनी आपल्या शाहिरीने लाखो जनतेत चेतना निर्माण केली. अण्णाभाऊ साठे यांनी फकिरासह तीसहून अधिक कादंबऱ्या, अनेक कथासंग्रह, पोवाडे आणि लोकनाट्ये लिहून मराठी साहित्याला नवी दिशा दिली. ''पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नाही, तर कष्टकरी जनतेच्या तळहातावर पेलली आहे,'' हा त्यांचा विचार आजही समाजाला प्रेरणा देतो. त्यांच्या साहित्याचे अनेक भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये भाषांतर झाले आणि त्यांना जागतिक स्तरावर मान्यता मिळाली. १८ जुलै १९६९ रोजी त्यांचे निधन झाले, परंतु संघर्ष, स्वाभिमान, सामाजिक न्याय आणि मानवतेचा त्यांनी पेटवलेला विचारांचा दीप आजही असंख्य पिढ्यांना प्रकाश देत आहे.

''माझी मैना गावाकडे राहिली...'' या गीतामागील पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी तत्कालीन संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास जाणून घेणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यानंतर भाषावार राज्यरचनेच्या प्रश्नावर मराठी भाषिक प्रदेशांचे विभाजन झाले आणि मुंबईसह अनेक मराठी भाग महाराष्ट्राबाहेर ठेवण्यात आले. या अन्यायाविरुद्ध महाराष्ट्रात तीव्र जनआंदोलन उभे राहिले. याच काळात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या शाहिरीतून आणि गीतांमधून महाराष्ट्राच्या अस्मितेचा आवाज बुलंद केला. ''माझी मैना गावाकडे राहिली...'' हे गीतही याच ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभूमीवर जन्माला आले असून, अनेक साहित्य अभ्यासकांच्या मते त्यातील ''मैना'' ही केवळ प्रेयसी नसून विभक्त झालेल्या मराठी भूमीचे आणि महाराष्ट्राच्या वेदनेचे प्रभावी प्रतीक आहे.

''माझी मैना गावावर राहिली, माझ्या जीवाची होतीय काहिली...'' हे शब्द ऐकले की अनेकांच्या मनात प्रेमविरहाची भावना जागी होते. परंतु या गीताचा खरा अर्थ केवळ प्रियकर-प्रेयसीच्या विरहापुरता मर्यादित नाही. हे गीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिभेचे असे शिखर आहे, ज्यामध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची वेदना, मराठी माणसाची अस्मिता आणि विभक्त झालेल्या भूमीची तगमग अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. लोकप्रियतेच्या शिखरावर असलेले हे गीत अनेकांनी प्रेमगीत म्हणून ऐकले; मात्र इतिहासाचा मागोवा घेतला तर लक्षात येते की अण्णाभाऊ साठे यांनी या गीतातून तत्कालीन राजकीय परिस्थितीवर अत्यंत सूचक आणि कलात्मक भाष्य केले होते.

स्वातंत्र्यानंतर भारतात भाषावार राज्यरचनेची मागणी जोर धरू लागली. मराठी भाषिक जनतेची एकच मागणी होतीमुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती व्हावी. परंतु तत्कालीन केंद्र सरकारने द्विभाषिक मुंबई राज्याची संकल्पना पुढे आणली. यामुळे महाराष्ट्रातील जनतेत तीव्र असंतोष निर्माण झाला. बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकी, डांग, उंबरगाव यांसारखे मराठी भाषिक भाग महाराष्ट्रापासून वेगळे राहिले. मुंबईच्या प्रश्नावरही मोठा संघर्ष सुरू झाला. हजारो कार्यकर्त्यांनी आंदोलन केले आणि १०५ हुतात्म्यांनी बलिदान दिले. या आंदोलनात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, आणि यांच्या शाहिरीने जनतेमध्ये प्रचंड ऊर्जा निर्माण केली. त्यांच्या पोवाड्यांनी आणि गीतांनी चळवळीला लोकशक्ती मिळवून दिली.

साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या या लोकप्रिय गीतामधील मैना म्हणजे नेमके कोण? या गीतातील ''मैना'' ही केवळ एखादी प्रेयसी नाही. तर अण्णाभाऊ साठे यांनी ''मैना'' हे प्रतीक वापरले आहे. अनेक साहित्य अभ्यासकांच्या मते, येथे ''मैना'' म्हणजे महाराष्ट्रापासून विभक्त झालेले मराठी भाषिक प्रदेश, तर ''गाव'' म्हणजे महाराष्ट्राची मायभूमी. विभक्त झालेल्या भूमीबद्दलची वेदना त्यांनी विरहगीताच्या माध्यमातून व्यक्त केली.

''माझी मैना गावावर राहिली...'' म्हणजे महाराष्ट्राचे अविभाज्य भाग आपल्या हातून निसटले, ही वेदना आहे. ''माझ्या जीवाची होतीय काहिली...'' म्हणजे त्या विभक्तीने मराठी जनतेच्या मनात निर्माण झालेली अस्वस्थता होय. यामुळे हे गीत प्रेमगीतापेक्षा अधिक व्यापक अर्थाने महाराष्ट्राच्या अस्मितेचे गीत बनते.

अण्णाभाऊ साठे संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सक्रिय होते. ते गावोगावी जाऊन शाहिरीच्या माध्यमातून लोकजागृती करत. त्या काळात राजकीय भाषणे प्रत्येकापर्यंत पोहोचत नव्हती; पण गीते, पोवाडे आणि लावण्या थेट जनतेच्या हृदयाला स्पर्श करत होत्या. अण्णाभाऊंनी संघर्षाचा संदेश लोकभाषेत दिला. ''माझी मैना गावावर राहिली...'' हे गीतही अशाच लोकभाषेतील रूपकात्मक अभिव्यक्तीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. प्रेमाच्या कथानकातून त्यांनी राजकीय वास्तव मांडले. त्यामुळे हे गीत सर्वसामान्यांच्या ओठांवर चढले आणि आंदोलनाची भावना अधिक तीव्र झाली. याच काळात त्यांच्या शाहिरीच्या कार्यक्रमांना प्रचंड गर्दी होत असे. कामगार, शेतकरी, विद्यार्थी आणि सामान्य नागरिक या गीतातून स्वतःच्या वेदना अनुभवत होते. गीत संपल्यानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणा घुमत असत, अशी नोंद अनेक समकालीन आठवणींमध्ये आढळते.



काळाच्या ओघात हे गीत चित्रपट, ध्वनिमुद्रिका आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमधून मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाले. त्यामुळे अनेकांनी ते केवळ प्रेमविरहाचे गीत म्हणून स्वीकारले. परंतु साहित्य अभ्यासकांनी वारंवार अधोरेखित केले आहे की या गीताला संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा सामाजिक आणि राजकीय संदर्भ आहे. रूपकात्मक लेखन ही अण्णाभाऊ साठे यांच्या शैलीची मोठी ताकद होती. त्यांनी साध्या शब्दांमध्ये अत्यंत मोठा संदेश दिला. तथापि, या गीतातील प्रत्येक ओळीचा अर्थ हा अण्णाभाऊ साठे यांनी स्वतः स्वतंत्रपणे स्पष्ट करून लिहून ठेवलेला उपलब्ध नाही. त्यामुळे आज प्रचलित असलेली प्रतीकात्मक व्याख्या ही साहित्य अभ्यासक, शाहिरी परंपरा आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या ऐतिहासिक संदर्भांवर आधारित आहे.

अण्णाभाऊ साठे यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी सामान्य माणसाची भाषा वापरली.

त्यांचे साहित्य वाचण्यासाठी विद्वान असण्याची गरज नव्हती; ते थेट लोकांच्या मनाशी संवाद साधत असे. त्यांच्या गीतांमध्ये अन्यायाविरुद्धचा संघर्ष आहे, श्रमिकांचा स्वाभिमान आहे, महाराष्ट्राच्या अस्मितेची जाणीव आहे आणि सामाजिक समतेचा संदेश आहे. म्हणूनच त्यांच्या रचना आजही तितक्याच ताज्या आणि प्रेरणादायी वाटतात. ''पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नाही, तर कष्टकरी जनतेच्या तळहातावर पेलली आहे.'' हा त्यांचा विचार जसा आजही मार्गदर्शक आहे, तसाच ''माझी मैना गावावर राहिली...'' हा अण्णाभाऊंचा स्वर आजही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक स्मृतीत जिवंत आहे.

''माझी मैना गावावर राहिली...'' हे गीत केवळ एका प्रेमिकाचा विरह नाही; ते महाराष्ट्राच्या जखमी अस्मितेचे गीत आहे. यात एका विभक्त झालेल्या भूमीची वेदना, जनतेच्या मनातील अस्वस्थता आणि न्यायासाठी लढण्याची प्रेरणा दडलेली आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी लोककलेचा उपयोग समाजजागृतीसाठी कसा करावा, याचे हे गीत एक अप्रतिम उदाहरण आहे.

म्हणूनच या गीताकडे केवळ सांगीतिक किंवा भावनिक दृष्टीने न पाहता, संयुक्त महाराष्ट्राच्या इतिहासाचा आणि मराठी स्वाभिमानाचा सांस्कृतिक दस्तऐवज म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल. त्या अर्थाने ''माझी मैना गावावर राहिली...'' हे गीत महाराष्ट्राच्या इतिहासातील एक अजरामर सांस्कृतिक स्मारक आहे.

**प्रा. सहदेव मोरे पाटील**
**छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वरफळ ता.परतुर जि. जालना**
**(मो. ९६२३८८८८००)**

## लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**जालना - प्रतिनिधी**
लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात मनपा उपआयुक्त, नंदा गायकवाड यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.
यावेळी, सहा. आयुकत मनपा सुप्रिया चव्हाण, नायब तहसिलदार सतिश तायडे, सहायक महसूल अधिकारी दिपाली राऊत, राहुल मुंढे, एन.बी. सोळुंके, पी.ए. मुळे, डी.एल. पवार, बी. एच. भिसे, श्री. चव्हाण, सुनिल काळुंके आदी कर्मचारी उपस्थित होते.

## स्व. वसंतराव नाईक यांचा जीवनप्रवास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करा

*मुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांकडे कैलास चव्हाण यांची मागणी*

**परतूर - प्रतिनिधी**
महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचा स्वतंत्र धडा इयत्ता ६ वी ते १० वीच्या शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रीय बंजारा महासंघाचे जालना जिल्हा उपाध्यक्ष तथा पत्रकार कैलास चव्हाण यांनी मुख्यमंत्री आणि राज्याचे शालेय शिक्षणमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.
निवेदनात म्हटले आहे की, स्व. वसंतराव नाईक यांनी सलग सुमारे ११ वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून कार्य करत कृषी, ग्रामीण विकास, सिंचन, रोजगार हमी, आदिवासी विकास, जलसंधारण आणि शेतकरीहिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्याच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा दिली. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे महाराष्ट्राच्या प्रगतीचा भक्कम पाया रचला गेला.



आजच्या विद्यार्थ्यांना राज्याच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या या महान नेत्याच्या कार्याची माहिती मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या जीवनातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, कर्तव्यनिष्ठा, सामाजिक बांधिलकी, लोकसेवेची प्रेरणा आणि महाराष्ट्राच्या विकासाचा अभिमान निर्माण होईल. त्यामुळे इयत्ता ६ वी ते १० वीच्या अभ्यासक्रमात स्व. वसंतराव नाईक यांच्या जीवनचरित्रावर व कार्यावर स्वतंत्र धडा समाविष्ट करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.
या मागणीचा सकारात्मक विचार करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व वैचारिक विकासासाठी आवश्यक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा कैलास चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.

## केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांची चित्रकूट निवासस्थानी सदिच्छा भेट



**जालना - प्रतिनिधी**
केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री मा. श्री. गिरीराज सिंह साहेब जालना दौऱ्यावर आले असता त्यांनी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांच्या चित्रकूट निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांचे श्री विठ्ठलाची मूर्ती भेट देऊन स्वागत व सत्कार केला.तसेच जालना शहराच्या विकासाच्या विषयांवर सविस्तर व सकारात्मक चर्चा करण्यात आली.
या प्रसंगी माजी केंद्रीय राज्यमंत्री मा. श्री. रावसाहेब पाटील दानवे, आमदार श्री. अर्जुनराव खोतकर, महापौर श्रीमती वंदना मगरे, उपमहापौर श्री. राजेश राऊत, श्री. भास्कर आंबेकर, श्री. रीतेश मिश्रा, श्री. अर्जुन गेही तसेच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जालना समाजकार्य महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**जालना - प्रतिनिधी**
दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांना जयंतीच्या निम्मिताने अभिवादन करण्यात आले यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.राजकुमार म्हस्के हे उपस्थित होते यावेळी प्राचार्य डॉ.राजकुमार म्हस्के यांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले या प्रसंगी उप प्राचार्य डॉ. मधू खोब्रागडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिपक बुक्तरे,प्रा. सुधीर गायकवाड,डॉ. नरसिंग पवार,डॉ. मीना बोर्डे,प्रकाश दांडगे,अनिल हजारे, किशोर ढेकळे,विष्णु भोसले,शाम कांबळे,राधाकृष्ण देशमुख, ऋषी पाटील,शिवाजी भुतेकर,अनिल वाघमारे, अंजीराम जाधव आदी उपस्थित होते.

## रस्त्यांवरील मोकाट जनावरांच्या अपघातांवर सर्वोच्च न्यायालयाची चपराक: पीडितांना भरपाई अन् महापालिकांना कडक नियमावली

### जालन्यातील गंभीर स्थितीवर ॲड. महेश धन्नावत यांची प्रतिक्रिया

**जालना - प्रतिनिधी**
रस्त्यांवर मोकाट फिरणाऱ्या भटक्या जनावरांमुळे होणाऱ्या प्राणघातक अपघातांच्या वाढत्या घटनांवर सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत गंभीर चिंता व्यक्त करत केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि स्थानिक प्रशासकीय संस्थांना विद्यमान कायद्यांची कडक अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती एन. कोटेश्वर सिंग यांच्या खंडपीठाने स्पष्ट शब्दांत बजावले की, राष्ट्रीय महामार्ग, मुख्य रस्ते आणि शहरांमधील गल्ल्यांमध्ये भटके गोवंश हे नैसर्गिक गतिरोधक म्हणून सोडून देण्यासाठी नाहीत. पंजाबमधील संगरूर येथील एका भटक्या बैलाच्या हल्ल्यात प्राण गमावलेल्या विजय कुमार यांच्या पत्नी निशा यांच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने १५ लाख रुपयांची भरपाई मंजूर केली. दुभती आणि कामकरी जनावरे उपयुक्तता संपल्यावर रस्त्यावर मोकाट सोडून देण्याच्या प्रवृत्तीवर ताशेरे ओढत न्यायालयाने नमूद केले की, देशात प्राण्यांच्या हल्ल्यांमुळे आणि अपघातांमुळे दरवर्षी १,३०० हून अधिक नागरिकांना नाहक जीव गमवावा लागत आहे.
या ऐतिहासिक निकालात सर्वोच्च न्यायालयाने विशेषतः महानगरपालिकांच्या जबाबदाऱ्यांवर प्रकाश टाकला आहे. भटक्या जनावरांची योग्य काळजी घेण्यासाठी, प्राण्यांचे निवारे (ॲनिमल शेल्टर्स) चालवण्यासाठी आणि त्यांची दैनंदिन नोंद ठेवण्यासाठी प्रत्येक महानगरपालिकेत आणि संबंधित विभागात एका विशेष नोडल अधिकाऱ्याची तात्काळ नियुक्ती करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. याशिवाय सर्व जनावरांचे इलेक्ट्रॉनिक टॅगिंग अनिवार्य करणे, त्यांची पशुवैद्यकीय तपासणी व लसीकरण करणे, उपयुक्तता संपलेल्या जनावरांना अधिकृत गोशाळांमध्ये हस्तांतरित करण्याची पावती प्रणाली उभारणे आणि अपघातातील पीडित पादचारी किंवा वाहनधारकांना तात्काळ नुकसानभरपाई देणारी सुटसुटीत नियमावली तयार करण्याचे कायदेशीर दायित्व महापालिकांवर सोपवण्यात आले आहे.
सर्वोच्च न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयाचे स्वागत करताना जालन्यातील ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ ॲड. महेश धन्नावत यांनी हा निकाल जालन्याच्या बदलत्या प्रशासकीय रचनेच्या दृष्टीने अत्यंत क्रांतिकारक असल्याचे सांगितले. जालन्यातील मंठा चौफुली, अंबड रस्ता, जुना जाफ्राबाद रस्ता आणि शहराला जोडणाऱ्या महामार्गांवर रात्रीच्या वेळी रस्त्याच्या मध्यभागी ठाण मांडून बसणारी मोकाट जनावरे दररोज भीषण अपघातांना आमंत्रण देत आहेत. या मोकाट जनावरांमुळे अनेक निष्पाप वाहनधारकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे.

## सीजीएचएस लाभार्थी कल्याण संघ, भारत (CBWAI) चा ८ वा स्थापना दिवस उत्साहात

*मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद*







**पुणे - प्रतिनिधी**
सीजीएचएस लाभार्थी कल्याण संघ, भारत ( CGHS Beneficiaries' Welfare Association of India – CBWAI ) यांच्या वतीने संस्थेचा ८ वा स्थापना दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त हॉस्पिटल, औंध यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला सीजीएचएस लाभार्थी, निवृत्त केंद्रीय कर्मचारी आणि ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हा कार्यक्रम कल्पतरू कम्युनिटी हॉल, एआरडीई इस्टेट, गणेशखिंड, पुणे येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. एम. व्ही. रमेश कुमार, उत्कृष्ट वैज्ञानिक तथा संचालक, आयुध संशोधन व विकास प्रतिष्ठान (), डीआरडीओ, संरक्षण मंत्रालय, पुणे हे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. चंद्रप्रकाश चौधरी, अपर संचालक, सीजीएचएस, पुणे यांनी मार्गदर्शन केले. सोबतच डॉ. संजीव केंद्रे आणि डॉ. राणा यांनी शुभेच्छा दिल्या. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संस्थेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.
यावेळी एम. व्ही. रमेश कुमार यांनी सीजीएचएस लाभार्थ्यांच्या आरोग्यविषयक सुविधा, प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीचे महत्त्व आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य संवर्धनासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. तसेच सीजीएचएस लाभार्थी कल्याण संघ, भारत () गेल्या आठ वर्षांपासून लाभार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने कार्य करत असल्याबद्दल संघटनेच्या कार्याचे कौतुक केले.
आरोग्य तपासणी शिबिरात रक्तदाब, रक्तातील साखर, ईसीजी, स्ट्रेस चाचणी तसेच विविध प्राथमिक आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. उपस्थित (पान २ वर)



शिवसेना दलित आघाडीच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करतांना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे,अण्णा बाळराज,अरुणा मगरे,रवी डोंगरे,हरिभाऊ कांबळे,गणेश काळे, सुरेश रामफळे ,सुनील घुळे,सुनील निर्मळ,सुभाष साठे आदी.

## हभप डॉ प्रमोद कुमावत यांचे झी टॉकीजवर प्रवचन

**दत्ता देशमुख**



संतसाहित्याचे व वेदांत तत्त्वज्ञानाचे अभ्यासक हभप डॉ प्रमोद कुमावत यांचे झी टॉकीज वाहिनीवर ५ व ६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७.३० ते ८.३० या वेळेत प्रवचन होणार आहे. गजर कीर्तनाचा सोहळा आनंदाचा हा कार्यक्रम झी टॉकीजवर चांगला गाजत आहे, यात परतीची वारी या विशेष भागात ही प्रवचने होणार आहेत.
डॉ प्रमोद महाराज कुमावत हे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालना येथे वरिष्ठ अधिव्याख्याता म्हणून सेवेत आहेत. चैतन्यसाधना प्रतिष्ठानचे ते अध्यक्ष असून या प्रतिष्ठानच्या वतीने ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग, भगवतगीता अभ्यास वर्ग, कठोपनिषद अभ्यास वर्ग असे विविध आध्यात्मिक ग्रंथांचे अभ्यास वर्ग तसेच विविध शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. यापूर्वी झी टॉकीज वाहिनीवर त्यांचे २१ कीर्तने प्रसारित झालेली आहेत. या प्रवचनाचा लाभ संतसाहित्याचे अभ्यासक तसेच भाविकांनी घ्यावा असे आवाहन चैतन्य साधना प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

## कर्माचा न्याय अटळ; आत्मपरीक्षण व धर्माचरणातूनच मोक्षप्राप्ती : महासती श्री निर्मलाजी म.सा.

**जालना । प्रतिनिधी**
''जीवाने केलेल्या प्रत्येक शुभ-अशुभ कर्माचा लेखाजोखा अचूक असतो. धन, सत्ता, प्रतिष्ठा किंवा प्रभावाच्या जोरावर कर्मफळ बदलता येत नाही. कर्माचा न्याय सर्वांसाठी समान असून आत्मपरीक्षण, सदाचार, संयम आणि धर्माचरण यांच्याद्वारेच आत्मकल्याण व मोक्षप्राप्तीचा मार्ग खुला होतो,'' असे प्रतिपादन महासती श्री निर्मलाजी म.सा. यांनी आपल्या ओजस्वी प्रवचनात केले.
भगवान महावीर आणि गौतम स्वामी यांच्या संवादाचा आधार घेत त्यांनी कर्मसिद्धांताचे अत्यंत मार्मिक विवेचन केले. पूर्वजन्मात सत्ता, अहंकार, अन्याय, हिंसा, लोभ, भ्रष्टाचार आणि प्रजेवर केलेल्या अत्याचारांचे परिणाम जीवाला पुढील अनेक जन्मांत भोगावे लागतात. मनुष्य कितीही सामर्थ्यवान असला तरी कर्माच्या न्यायापासून त्याची सुटका होत नाही. पापकर्मांचा परिणाम दुःख, वेदना आणि अधोगतीच्या रूपाने समोर येतो, तर सत्कर्म आत्मोन्नती आणि मोक्षाचा मार्ग प्रशस्त करतात, असे त्यांनी सांगितले.




प्रवचनादरम्यान त्यांनी भगवान महावीरांनी गौतम स्वामींना सांगितलेल्या एका प्रसंगाचे विवेचन करत, पूर्वजन्मी सत्तेचा गैरवापर करून प्रजेला छळणाऱ्या व्यक्तीला पुढील जन्मांत भीषण यातना कशा भोगाव्या लागल्या, याचे हृदयस्पर्शी वर्णन केले. हा प्रसंग सांगताना त्यांनी उपस्थितांना कर्मबंधनाचे गांभीर्य समजावून सांगत, प्रत्येकाने आपल्या कृतींबाबत सजग राहण्याचे आवाहन केले.
त्या म्हणाल्या की, आजच्या काळात धन आणि सत्तेच्या मोहापायी अनेकजण सत्य, न्याय आणि नैतिकतेचा मार्ग सोडतात. भ्रष्टाचार, लाचलुचपत, शोषण, अन्याय आणि स्वार्थाच्या आधारे मिळवलेले यश क्षणिक असते; मात्र त्यातून निर्माण होणाऱ्या कर्मबंधनाचे परिणाम अनेक जन्मांपर्यंत जीवाला भोगावे लागतात. त्यामुळे इतरांच्या दोषांकडे बोट दाखविण्याऐवजी प्रत्येकाने स्वतःच्या आचरणाचे आत्मपरीक्षण करून जीवनात सत्य, अहिंसा, दया, क्षमा, संयम आणि त्याग या मूल्यांचा स्वीकार करावा.
यावेळी त्यांनी राजस्थानच्या इतिहासातील राणी पद्मिनी यांच्या (पान २ वर)

## नांदखेडा, किन्ही, काचनेरा परिसरात रात्रीला सिंगल फेज वीजपुरवठ्याची मागणी; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**जाफ्राबाद - प्रतिनिधी**
: जाफ्राबाद तालुक्यातील गट ग्रामपंचायत नांदखेडा, किन्ही व काचनेरा परिसरात दिवसा सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्यात यावा, अन्यथा महावितरणच्या उपकार्यकारी अभियंता कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सरपंच सौ. सूर्यकलाबाई गुलाबराव सबडे यांनी दिला आहे.
याबाबत उपकार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग, जाफ्राबाद यांना निवेदन सादर करण्यात आले. पावसाळ्यामुळे शेतात सर्प व विंचूंचा वावर वाढला असून रात्रीच्या अंधारात शेतकऱ्यांसह मुक्या जनावरांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच परिसरात रात्री उशिरा वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना शेतीची कामे करताना अडचणी येत आहेत. विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही त्याचा विपरीत परिणाम होत असल्याने दिवसा सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. मागणीकडे दर्लक्ष झाल्यास महावितरण कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.
या निवेदनावर उपसरपंच भरत अवचितराव जाधव, ग्रामपंचायत अधिकारी एम. आर. डोईफोडे, बाबासाहेब सवडे, सरपंच शिराळा पांडुरंग दुनगहु, पंढरीनाथ म्हस्के मनसे तालुका सरचिटणीस, दिलीपराव सवडे, विलास सवडे (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.